


साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे   Editor : Anil Waghmare




■ वर्ष ११ ■ अंक ४४ ■ शुक्रवार, दि. २९ मे २०२६ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

11th year, 44th paper, Friday Date: 29 May 2026, R.N.I. MAHMAR/2015/62614, Postal Permission : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 Price : Rs.1, Pages :4, Page -1

# वडवणी शहर आणि तालुक्यात अवकाळी पावसाने मोठे नुकसान

**डोंगरचा राजा**
**विशेष वृत्त..**

वडवणी शहरासह तालुक्यात बुधवारी रात्री उशिरा अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत नागरिकांचे मोठे नुकसान केले. वीजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी भीतीचे वातावरण निर्माण झाले. अचानक आलेल्या या पावसामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गाचे मोठे हाल झाले आहेत.

वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली असून गरीब कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. शहरालगतच्या अनेक भागात गारपिटीचीही नोंद झाली असून अंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तुफानी वाऱ्यामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणी शेकडो विद्युत पोल कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत असून लाईट नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

दरम्यान, तहसील प्रशासनाने या परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन नुकसानग्रस्त भागांची पाहणी करावी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**सोलार पॅनल उडाले..**

एकीकडे फळबागा, मोठे वृक्ष यांचे वादळी वाऱ्यामुळे नुकसान

झालेले असतांना दुसरीकडे शेतामधील सौर ऊर्जेवरील पंपाच्या पॅनलचेही मोठे नुकसान झोले आहे. या सर्वांचे पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी होत आहे.













- विजांचा कडकडाट..
- वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस..
- तहसील प्रशासनाने दखल घ्यावी..
- घराची पडझड..
- अंब्याचे मोठे नुकसान..
- वादळी वाऱ्या मूळे शेकडो विद्युत पोल कोसळले..
- रात्री उशिरा जोरदार पाऊस..
- शहरालगत परिसराच्या गारांचा पाऊस..
- गोर गरीबांचे संसार उद्धवस्त..
- प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून मदत करावी..
- लाईट नसल्याने नागरीक हैरान..




दैनिक **डोंगरचा राजा** वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

www.dongarcharaja.com   email : dongarcharaja@gmail.com

प्रति,
मा.महोदय ______________________

आपल्या सर्वांच्या पाठबळावर सा.डोंगरचा राजाने आकरा वर्ष पूर्ण करून आता दैनिक डोंगरचा राजा म्हणून पहिल्या वर्षात पदार्पण करत आहे... गत आकरा वर्षात वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांच्या पाठबळावर ही वाटचाल केली... अकराव्या अन् दैनिक डोंगरचा राजा म्हणून नव्या वर्षात पदार्पण करतांना या आकरा वर्षाच्या प्रवासाचा आढावा घेण्याचा मोह टाळता येत नाही... एका दैनिकाचा तालुका प्रतिनिधी म्हणून काम करत असतांना आम्ही स्वतंत्र साप्ताहिक सुरु करुन संपादक म्हणून जबाबदारी सांभाळण्याची हिंमत केली ती केवळ वाचकांच्या पाठबळावरच.! वडवणी, माजलगाव, धारूर बरोबरच संबंध जिल्ह्यातील हितचिंतकांनी अगदी पहिल्या अंकापासूनच भरभरून प्रेम केले, पाठींबा व्यक्त केला कधी शाब्दीक तर कधी आर्थिक आधार दिला... या आधाराच्या जोरावरच या आकरा वर्षाचा प्रवास सक्षमकपणे करता आला.

डोंगरचा राजाने या वृत्तपत्राच्या माध्यमातून जनतेचा आवाज बुलंद केला. आता डीजीटल आवृत्ती, वेबसाईट व यु ट्युब चॅनलच्या माध्यमातून वेगवेगळ्या स्वरुपात जनतेचे प्रश्न मांडण्याचे काम केले जात आहे.. डोंगरचा राजाला वृत्तपत्र स्वरुपात जसे भरभरून प्रेम वाचक, हितचिंतकांचे मिळाले तसेच डिजीटल आवृत्ती व यु ट्युबलाही मिळत आहे. आज आकरा वर्ष पूर्ण करून आम्ही आता दैनिक डोंगरचा राजा च्या माध्यमातून पहिल्या वर्षात पदार्पण करत असतांना डोंगरचा राजाच्या माध्यमातून मांडले गेलेले अनेक प्रश्न मार्गी लागले असले तरी आणखी काही उभेही राहीले आहेत... ते सोडवण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरुच राहणार आहे. यासाठी वाचक, हितचिंतकांचा भक्कम आधार असायलाच हवा... आगामी काळात सर्वसामन्यांच्या हितासाठी, बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दैनिक डोंगरचा राजाची भूमिका अधिक आग्रही राहणार आहे. अगदी तीनही प्रकारात दैनिक डोंगरचा राजा सर्वसामान्य वाचक, जाहिरातदार हाच विठ्ठल मानून वारकरी बनून सेवा करत आला आहे. जनतारुपी हा विठ्ठलही जणू आमच्यावर प्रसन्न झाल्यामुळे प्रशासन असो वा शासनाला दखल घ्यावीच लागलेली आहे. यापुढील काळात आपल्या सर्वांच्या पाठबळावर प्रवास सुरूच राहणार आहे.!

या पहिल्या अंकासाठी जाहीरात स्वरुपात आपले सहकार्य मिळेलच हि अपेक्षा..!

अनिल वाघमारे
मुख्य संपादक

## संपादकीय

# घुसखोरी थांबणार

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमध्ये मिळालेल्या घवघवीत यशामुळे या मोहिमेसाठी आवश्यक असणारे राजकीय बळ सरकारसाठी भक्कम आधार ठरणार आहे. देशातील अनैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि बेकायदेशीर स्थलांतर या गंभीर आव्हानाचा सखोल अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश प्रभाकर नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. ही समिती देशभरात वेगाने बदलत असलेल्या लोकसंख्येच्या रचनेचा, तिच्या कारणांचा आणि त्याचे देशाच्या सुरक्षेवर होणार्या परिणामांचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करुन उपाय सुचवणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील वर्षीच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात देशातील काही विशिष्ट भागांमध्ये अनैसर्गिकरीत्या लोकसंख्येचा समतोल बिघडत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली होती. बेकायदेशीर घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणारे अनैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय बदल हे कोणत्याही राष्ट्राच्या वर्तमान आणि भविष्यासाठी अत्यंत मोठे आव्हान ठरतात.

सुरुवातीला असे बदल प्रामुख्याने सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये दिसून येत होते; परंतु आता त्याचे परिणाम देशातील प्रमुख शहरे, औद्योगिक पट्टे, आदिवासी भाग आणि इतर सामाजिक-आर्थिकदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांमध्येही स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. ईशान्येकडील राज्यांमध्ये होणारी बांगला देशींची घुसखोरी हा गेल्या अनेक वर्षांपासूनचा चिंतेचा विषय राहिला आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या सरकारच्या १५ वर्षांच्या काळात या घुसखोरांना राजाश्रय मिळाल्यामुळे हा प्रश्न कमालीचा जटिल बनला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने या अवैध स्थलांतरितांना परत पाठवून देण्याचे आश्वासन दिले होते. आता मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या सरकारने या दिशेने वेगाने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.

पश्चिम बंगाल, आसाम, उत्तर प्रदेश, बिहार आणि ईशान्येकडील अनेक राज्ये सध्या तीव्र जनसांख्यिकीय बदलांचा सामना करत आहेत. काही विशिष्ट जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येचे हे संतुलन इतक्या वेगाने बिघडले आहे की, त्यामुळे तेथील मूळ संस्कृती, संसाधने आणि स्थानिक नागरिकांच्या अधिकारांवर गदा येऊ लागली आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात मुस्लिम लोकसंख्या ६६ टक्क्यांवर पोहोचली असून, हिंदू लोकसंख्या ३३ टक्क्यांवर आली आहे. मालदा जिल्ह्यात ५१ टक्के मुस्लिम आणि ४९ टक्के हिंदू अशी स्थिती निर्माण झाली आहे. हीच परिस्थिती आसाममध्येही पाहायला मिळते. हे बदल नैसर्गिक नसून, पद्धतशीरपणे झालेल्या अवैध घुसखोरीचे थेट परिणाम आहेत, हे आता उघड झाले आहे. देशात झालेल्या दहशतवादी कारवायांमध्ये या घुसखोरांचा हात असल्याचे स्पष्ट झाले होते. तरीही अशा घुसखोरांना शोधण्यासाठी 'डिटेंशन सेंटर्स' उभारण्याची किंवा त्यांची ओळख तपासण्याची मोहीम राबवली जाते, तेव्हा विरोधकांकडून त्याला विरोध केला जातो; पण हा विरोध देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला कमकुवत करणारा आहे. भारताच्या संसाधनांवर पहिला अधिकार या देशातील वैध आणि प्रामाणिक करदात्या नागरिकांचा आहे.

कोणत्याही बाह्य शक्तीला देशाची सुरक्षा धोक्यात आणण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. त्यामुळे राजकीय पक्षांनी राजकारण बाजूला ठेवून, देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणार्या या मोहिमेला पाठिंबा देणे गरजेचे आहे. घुसखोरीविरोधातील हा लढा संपूर्ण भारताच्या भविष्याचा आणि सुरक्षेचा लढा आहे. जगातील संपन्न असलेले देशही आपल्या सीमांच्या सुरक्षेबाबत कमालीचे संवेदनशील आहेत. ते देश आपल्या भूमीवरील प्रत्येक अवैध घुसखोरांना शोधून बाहेर काढत आहेत. अशा स्थितीत भारताने आपल्या राष्ट्रीय सुरक्षेबाबत कठोर भूमिका घेण्यात गैर काय? पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी 'बांगला देशातून अवैधरीत्या आलेल्यांनी तत्काळ हा देश सोडून निघून जावे, घुसखोरांना तुरुंगात ठेवून देशाच्या पैशावर, करदात्यांच्या पैशावर मोफत अन्न, कपडे आणि औषधे दिली जाणार नाहीत, ते या देशाचे जावई नाहीत' अशी ललकारी दिल्यानंतर अवैध घुसखोरांचे तांडेच्या तांडे सीमेवर पाहायला मिळत आहेत.

येणार्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमांवर घुसखोरी पूर्णपणे रोखण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'स्मार्ट सिक्युरिटी ग्रिड' उभारली जाणार आहे. केंद्र सरकारच्या समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर 'डिटेक्ट, डिलीट आणि डिपोर्ट' म्हणजेच घुसखोरांना शोधणे, त्यांची नावे मतदार यादीतून आणि सरकारी लाभांमधून वगळणे आणि शेवटी त्यांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवणे या त्रिसूत्रीवर आधारित कायदेशीर कारवाई अधिक वेगाने सुरू होईल. चीन, नेपाळ, म्यानमार, बांगला देश आणि पाकिस्तान या शेजारी देशांनी आपल्या सीमा जोडलेल्या आहेत. या देशांमध्ये होणार्या राजकीय उलथापालथी आणि आंदोलनांचा थेट परिणाम भारताच्या सीमांवर होत असतो. अशा परिस्थितीत, सीमा सुरक्षित करणे आणि अंतर्गत भागात लपलेल्या अवैध घुसखोरांना शोधून काढणे ही राष्ट्रीय निकड बनली आहे. केंद्राने नेमलेल्या समितीकडून या प्रश्नाबाबत कोणते ठोस उपाय समोर येतात, हे पाहायचे.

# शासकीय सेवेची कार्यपुर्ती ते निवृत्ती

माझी शासकीय नौकरीची सुरुवात दि. ४ ऑक्टोबर १९८९ रोजी झाली व मी प्रथम घराचा उबंरा ओलांडला आणि शासकीय सेवेत दाखल झाले. तसे माझा सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक अनुभव तोकडा होता. शिक्षण म्हणजे सिंधुताई सपकाळ म्हणा किंवा बहिणाबाई चौधरी चौथी फेल. जालना येथे माझी नियुक्ती छत्रपती संभाजीनगर येथील माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे उपसंचालक स्वर्गवासी एकनाथ गायकवाड साहेब यांच्या कार्यकाळात अनुकंपातत्वावर स्वच्छक नि सेवक या पदावर नियुक्ती झाली. तसा माझा जालना येथील नौकरीचा काळ काही चांगला गेला नाही. कारण मी प्रथमच शासकीय कार्यालयाची पायरी चढले होते. प्रथम माझा ग्रामीण भागातील अडाणी वेश शासकीय सेवेत कसे वागायचे याबाबत मी अनभिज्ञ होते.

हळु हळु कार्यालयातील कामकाज समजुन घेतले पण कायद्याचे ज्ञान नव्हते यामुळे त्यावेळचे जिल्हा माहिती अधिकारी यांनी माझ्याकडून घरगुती कामे साफसफाई पाणी भरणे, इतर घरगुती कामे करुन घेतली. काही कालावधीनंतर मला काही सहका-यांनी सांगितले की तुमची नेमणुक ही कार्यालयीन कामकाजासाठी आहे. तुम्ही घरी काम करु नका. मी घरच्या कामास नकार दिला त्यामुळे मला या अधिका-यांनी खूप त्रास दिला, या त्रासला मी जुमानले नाही. त्यामुळे अधिकारी नावाला कलंक असलेल्या त्या अधिका-याने माझ्या सेवापुस्तकात चारित्र हननाचा शेरा देखील मारला.

माझ्या काही हितचिंतकांनी मला १० वी ची परिक्षा देण्याविषची सूचना केली अन्? मी १७ नंबरचा फॉर्म भरुन परीक्षेला बसले. मी रितसर परिक्षेची अनुमती घेऊन परिक्षेला जाण्यासाठी रजा मागितली पण ती मंजूर करण्यात आली नाही. मी १५ दिवस परिक्षेसाठी गेले अन्? याच कालावधीत या अधिका-यांनी त्या काळचे उपसंचालक मधू काळे यांना भेटून माझी नांदेड येथे बदली केली.

नांदेड येथे जाण्यासाठी माझी उत्सुकता नव्हती, माझ्या सोबत माझ्या सासुबाई, माझी ८ वर्षाची मुलगी घेऊन एवढया दूर कसे रहावे या चिंतेत मी होते. काही लोकांनी नांदेडला तेथील लोक चांगले नाहीत, खुप त्रास देतात म्हणून भिती घातली. याच काळात आमच्या गल्लीत राहणारे अंभोरे सर हे शिक्षक होते, त्यांची भेट घेऊन मी बदलीविषयी बोलले तर त्यांनी सांगितले की तुम्ही बीनधास्त रुजु व्हा कुणी त्रास देत नाही, त्यांनी खुप समजुत घातली. त्यामुळे मला मानसिक आधार मिळाला याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्यानंतर मी १९९४ मध्ये नांदेड या कार्यालयात रुजु झाले.

जालना येथुन नांदेड येथे जाण्यासाठी रेल्वे लाईन मिटरगेज होते. मी कार्यालयात रुजु झाले. यावेळी श्री. सुरेश काचावार यांच्याकडे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून अतिरिक्त कार्यभार होता. त्यांनी राहण्याविषयी व्यवस्था विचारली तर मी रुम घेऊन राहण्याचे सांगितले. त्यांनी लगेच कार्यालयातील शिपाई पाठवून रुम पाहून दिली. मला इकडे येण्याविषयी जी भिती होती ती व्यक्त केली. कार्यालयातील सर्वच कर्मचा-यांनी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, इथे काही भिती नाही. काळजी करु नका असे धीराचे वाक्य उच्चारल्याने मला खूपच समाधान वाटले अन्? माझी नांदेडला बदली झाल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.रुमची व्यवस्था करुन मी रजा टाकून जालन्याकडे निघाले. तेव्हा काचावार साहेब यांनी अर्ज फाडुन टाकला. दोन ते तीन दिवसानी सामान आणा काही घाई करु नका. म्हणून जाण्यास अनुमती दिली. चिखलवाडीमध्ये कार्यालय होते रुम पण तेथेच घेतली. माझ्याकडे कोषागाराचे काम, आणि पाणी भरणे, कात्रणे काढणे ही कामे दिली.

येथे काम करत असतांना महानुभाव आश्रमातील प.पु.प.महंत मनोहार शास्त्री शेवलीकर हे कार्यालयात वृत्तपत्र घेऊन आले असतांना त्यांनी माझ्या पदाची, शिक्षणाची विचारपूस केली असता माझे दहावीचे दोन विषय नापास असल्याचे मी सांगितले. तेव्हा त्यांनी मुक्त विद्यापिठात १२ वी ला प्रवेश घेण्याविषयी सुचविले. त्यानुसार मी यशवंत महाविद्यालय येथे चौकशी केली असता पूर्वतयारी परीक्षेला तीनशे रुपये प्रवेश फीस असल्याची माहिती तेथील व्यवस्थापक विभूते सर यांनी दिली व अभ्यासक्रमाचे विषय,पध्दती समजावून सांगितली.मी विद्यापीठातुन आले अन्? विचार करत बसले तेव्हा श्री. काचावार साहेब यांनी विचारले काय झाले बाई? घेतला का प्रवेश. तेव्हा मी ३००/- रुपये फीस नसल्याचे सांगितले. त्यांनी लगेच ३००/- रुपये आणि कार्यालयाची गाडी, शिपाई दिला व मला प्रवेश घेण्यास पाठविले. मला बी.ए. पास होण्याला ७ वर्ष लागले माझा इंग्रजी विषय निघत नव्हता. पुन्हा शास्त्री बाबांनी हिंदी व इंग्रजी विषय घेण्यास सांगितले व १९९५ ते २००१ मध्ये मी बी.ए.पदवी व टायपींग ३० उतीर्ण झाले.

तसेच नांदेड येथे असतांना विशेष करुन नांदेड एकजुटचे संपादक धोडोपंत विष्णूपुरीकर यांचे विशेष सहकार्य मिळाले, अजुनही मिळते. हिंगोली येथे पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नंदुभाऊ तोष्णीवाल यांचे व माझी मैत्रीण माजी नगरसेविका वनिता गुजांळ यांच्या सोबत कौटुंबिक नाते होते. जालना येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष हाफिजभाई यांनीही मला वेळोवेळी सहकार्य केले. या सर्वाच्या सहकार्यामुळे मी माझ्या कार्यकाळात एक दोन अधिकारी सोडले तर सर्वच जिल्हा माहिती अधिका-यांनी मला सांभाळून घेतले.

१९९७ पासून वृत्तपत्र वाचत वाचत मी केव्हा लिखाणाकडे वळले हे पण मला कळलेच नाही. मी कविता लिहायचे या कविता नांदेड येथील विविध वृत्तपत्रात प्रसिध्द होत असत, तसेच तेथील कर्मचारीही कविता छान आहे म्हणून प्रोत्साहन द्यायचे. साहित्याची नशाच अशी आहे की, लेखकाला तो अनंद शब्दात वर्णन करता येत नाही. माझ्या कविता वाचून ब-याच रसिकांचे मला फोन यायचे तुमचा काव्यसंग्रह आहे का? मग वाटले आपण काव्यसंग्रह प्रकाशित केला पाहिजे अन्? पहिला काव्यसंग्रह मनिषा २००२ मध्ये प्रकाशित झाला. वृत्तपत्रातील लिखाण वाचून नांदेड आकाशवाणीतील अधिकारी, मिरजकर मॅडम यांचा मला त्यावेळी टेलीफोन आला. आपण चांगले लिखाण करता आकाशवाणीसाठी काही साहित्य पाठवा. तेव्हापासून दर तीन महिन्याला त्या मला काव्य वाचन, कथा, प्रासंगीक लेखाचे विषय देऊन आकाशवाणीला बोलवायच्या. मला पहिले मानधन ६००/- रुपये मिळाले तेव्हा मला गगन ठेंगणे झाले होते. अभ्यासाची आवड तर पूर्ण झाली तसेच साहित्यातही वेगळा ठसा उमटल्याने तो क्षण मी कधीही विसरु शकणार नाही. कारण ते ६००/- रुपये माझ्या कलेचे, कष्टाचे तर होतेच पण ती माझ्या लेखणाची पावती होती. यानंतर परभणी, छत्रपती संभाजीनगर, बीड या आकाशवाणी केंद्रावरही माझे विविध विषयावर साहित्याचे वाचन झाले.

मी १० वर्ष जिल्हा माहिती अधिकारी श्री. अनिल अलुरकरसाहेब यांच्या कार्यकाळात काम केले. त्यांनीही मला वेळो वेळी लेख लिहीण्यास प्रोत्त्साहन दिले तसेच पदोन्नतीसाठीही शिफारस केली.२००६ मध्ये मला सर्वसाधारण सहाय्यक म्हणुन हिंगोली येथे पदोन्नती झाली. तेथील साहित्यिक विलास वैद्य, कैलास नाईक, नरेंद्र नाईक, रत्न आडे, महारुद्र घेणेकर अशा विविध साहित्यीकांशी ओळख झाली अन्? आमची दर महिन्याला काव्य मैफल सजू लागली. यातुन माझ्या साहित्याला नवे धुमारे फुटु लागले. वाचन, लिखाण,साहित्याचे विविध उमक्रमाने हिंगोली हा छोटा जिल्हा मला आवडू लागला. हिंगोलीत माझे दोन पुस्तके मीच मला शोधते कथासंग्रह,२००८ मध्ये व दुसरी अवृत्ती २०१३ मध्ये प्रकाशित झाली. स्पर्शाचा गाव ललित लेख संग्रह प्रकाशित झाला. २००९ साली कळमनुरी येथील सातव महाविद्यायामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातुन एम.सी.जे अभ्यासक्रम पूर्ण केला.

२०११ साली माझी जालना येथे बदली झाली. येथे माझा अभास हा ललीत लेखसंग्रह प्रकाशित झाला.

२०१७ साली माझी बीड येथे पदोन्नतीने दुरमुद्रकचालक या पदावर नियुक्ती झाली. लगेच माझ्याकडे अ.माहिती अधिकारी पदाचा कार्यभार सोपवण्यात आला. इथे काम करतांना सुरुवातीला थोडा त्रास झाला पण नंतर मात्र सर्व पत्रकारांचे, मैत्रीनींचे सहकार्य मिळत गेले. येथे माझा २०२० मध्ये अक्रित नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला.

बीड येथे २०२३ मध्ये मा. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर साहेब रुजु झाले ते एकदम शांत स्वभावाचे काहीही चूक झाली तरी अधिकारी म्हणून ते कधी जोरात बोलले नाही की रागावले नाही. माझ्या बातमीत खुप चूका असायच्या पण ते शातंतेने सांगायचे बातमी टाईप केली की वाचून घेत जा.

एवढेच सांगायचे.तसेच माझ्या सहकारी रेवती लाबडे, गजानन शिंदे, दिपक पवार, सावता गुंजाळ, कृष्णा डोईफोडे यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लाबडे मॅडम या पुणे येथे असल्या तरी त्या अजुनही मदत करतात त्यांची मी अत्यंत आभारी आहे. माझ्या पाठीशी कोणत्याही नातेवाईकांचे पाठबळ किंवा मार्गदर्शन तसेच पाठीवर शाबासकीची थाप नसतांना मी या काटेरी वाटेतून सुगंधीत फुले वेचत इथपर्यंत पोहचले, यात माझी मुलगी मनिषा हिची मोलाची साथ असल्यामुळे मी इथपर्यंत मजल मारु शकले. जालना येथून शासन सेवेचा प्रवास सुरु झाला अन्? बीड येथे माझ्या शासकीय सेवेतील जबाबदा-या, कर्तव्य पार पाडून ३१ मे २०२६ रोजी शासन सेवेतून सेवानिवृत होत आहे. मला सहकार्य लाभलेल्या सर्व गुरुजन वर्ग व सहका-यांचे मी ऋण व्यक्त करत नाही पण त्याच्या ऋणात राहू इच्छिते.

**बी.जी. अंबिलवादे**
**जिल्हा माहिती कार्यालय,बीड**

## नीट पेपरफुटी विरोधात एसएफआय व डीवायएफआयचे

# जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने




बीड : प्रतिनिधी

वैद्यकीय शिक्षणासाठी रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी केंद्र सरकारने खेळ केला असून नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील संशयास्पद प्रकारांमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे, असा आरोप करत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) यांच्यावतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकार आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) विरोधात जोरदार घोषणाबाजी करत दोषींवर कठोर कारवाई

करण्याची मागणी केली. आंदोलकांचे म्हणणे आहे की, नीट परीक्षेतील पेपरफुटी हा केवळ घोटाळा नसून लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टांची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे. विद्यार्थ्यांनी अनेक वर्षे प्रचंड मेहनत घेऊन परीक्षा दिली, मात्र पेपरफुटीमुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे.

एसएफआय आणि डीवायएफआयने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा परीक्षांमध्ये गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे देशातील परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली असून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

संघटनांनी मागणी केली की, नीट पेपरफुटी प्रकरणी जबाबदार असलेल्या एनटीएच्या अध्यक्षांचा तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा. तसेच या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

या आंदोलनात डीवायएफआयचे राज्य अध्यक्ष मोहन जाधव, राज्य कमिटी सदस्य विशाल देशमुख, सुहास झोडगे, प्रशांत मस्के, महेश देशमुख, शरद नांदे, इस्माईल शेख आदी सहभागी झाले होते.तसेच एसएफआयचे राज्य अध्यक्ष रोहिदास जाधव, जिल्हा अध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचणी, अभिषेक शिंदे, हमीद शेख, प्रथमेश उपाडे, विशाल राठोड, तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी पायल, कावेरी आणि सृष्टी यांनीही आंदोलनात सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या भ्रष्ट परीक्षा व्यवस्थेविरोधात देशभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही संघटनांच्या वतीने यावेळी देण्यात आला.

### तुला ही जगावं लागेल

हिऱ्या सम घाव,
रडत - पडत
तुला ही सोसावं लागेल...
नश्वर असे जीवन,
लढत पडत तुला
ही जगावं लागेल...

एकदा उजळण्यासाठी,
अमर्यादित चटके सोसावे
लागेल...
दिसत तितकं सोप्प नसत,
हे ही स्वीकारावं लागेल...

सोन्यागत चकाकण्यासाठी,
स्वतः ला जाळावं लागेल...
दररोज मरण स्वीकारून,
सुतक ही पाळावं लागेल...

हवं ते मिळवण्यासाठी,
स्वतःलाच झुंझाव लागेल...
विरोधाच्या भट्टीत अनेकदा,
तुला ही भाजावं लागेल...

नाण्यासम चमकण्यासाठी,
तुला ही झिजावं लागेल...
मनात जिवंत राहण्यासाठी,
तुला ही रुजावं लागेल..

ज्वलंत स्वप्न जपण्यासाठी,
तुला ही हसावं लागेल..
दिवस काळोखाचा असला तरी,
तुला जगावंच लागेल..

यशाचं शिखर गाठण्यासाठी,
काट्यांमध्ये ही लोळावं
लागेल...
यशाचं गाडगं फुटेपर्यंत,
तुला ही नियतीशी खेळावं
लागेल...

या जगातच देणं,
तुला ही फेडावं लागेल...
वेळे अगोदर मृत्यू नाही,
म्हणून तुला ही जगावं लागेल...

**कु.उर्वशी मनिष संघवी,**
**रा. मुर्तिजापूर, जि.अकोला**

# आ.सोळंके यांनी बौद्ध समाजाच्या जमिनी लाटल्याचा आरोप खोटा : मनोज साळवे

माजलगांव:प्रतिनिधी

मौजे फुलेपिंपळगाव शिवारातील गट क्रमांक २० मधील गायरण जमीन ही बौद्ध समाजातील शेतकऱ्यांची असून, संबंधित शेतकरी अनेक वर्षांपासून ती जमीन कसून आपला उदरनिर्वाह करत असल्याची माहिती मनोज साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सन २००५ ते २०१० या कालावधीत गट क्रमांक २० मधील ३३ शेतकऱ्यांपैकी केवळ दोन शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने जमीन विक्री केली होती. त्यानंतर आजपर्यंत कोणत्याही शेतकऱ्याने जमीन विक्री केलेली नसून शासनाकडून पुढील कोणत्याही विक्रीस परवानगी देण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"माझ्यासह गटातील कोणत्याही शेतकऱ्याची गायरण जमीन आमदार प्रकाश सोळंके यांनी खरेदी केलेली किंवा लाटलेली नाही," असा ठाम दावा मनोज साळवे यांनी केला आहे.सध्या काही राजकीय व्यक्तींमार्फत सोशल मीडियावर आमदार प्रकाश सोळंके यांनी कमी भावात जमीन विकत घेतल्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत.मात्र या दाव्यांना कोणताही तथ्यात्मक आधार नसल्याचे साळवे यांनी सांगितले.शासनाने कसण्यासाठी दिलेली जमीन आम्ही स्वतः कसत असून, त्याबाबत चुकीची माहिती समाजमाध्यमांतून पसरवू नये,असेही त्यांनी म्हटले आहे.तसेच गट क्रमांक २० मधील कोणत्याही शेतकऱ्याने माधव निर्मळ यांच्याकडे आमदार



प्रकाश सोळंके यांच्या विरोधात जमीन लाटल्याची तक्रार केलेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.माधव निर्मळ यांनी ज्या बाँड पेपरचा संदर्भ दिला आहे,तो गटातील शेतकऱ्यांच्या बनावट सह्या करून तयार करण्यात आलेला बनावट व बोगस दस्तऐवज असल्याचा आरोपही त्यांनी केला. काही वृत्तपत्रे व माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. "या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही.माधव निर्मळ यांनी आमदार प्रकाश सोळंके यांच्याशी असलेल्या राजकीय मतभेदातून आमच्या जमिनीचा व बौद्ध समाजाचा गैरवापर करून खोट्या बातम्या पसरवल्या आहेत," असा आरोप मनोज साळवे यांनी केला.

यापुढे अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसारित करून आमच्या समाजाचा व जमिनीचा राजकीय वापर केल्यास संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच सदर बातम्यांचा आमच्या जमिनीशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट करत, "आमच्या जमिनीचा व बौद्ध समाजाचा राजकीय हेतूसाठी वापर करू नये," असे आवाहन त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
शुक्रवार, दि.२९ मे २०२६ । पान ३

# वादळी वाऱ्यामुळे पात्रुड येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

माजलगाव :प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड येथे काल ५ वाजेच्या दरम्यान अवकाळी पाऊस व ससोटयाचे वादळ वारे सुरु होऊन या वादळामध्ये अनेक झाडे उन्मळून पडली अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली तर शेतकऱ्यांचे सोलर पॅनलचे या वादळामुळे सोलर प्लेट फुटल्याने नुकसान झाले आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, काल दि. २३ मे शनिवार रोजी सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान पात्रुड येथे ससोट्याची वादळी वारे सुरू झाले तसेच काही ठिकाणी बाराच्या पावसाची देखील सुरुवात झाली अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे पात्रुड येथील जनजीवन विस्कळीत झाले असून या वादळी वाऱ्यामुळे अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेली गावातील व शेतातील अनेक झाडे उन्मळून पडली तर शेतातील शेतकऱ्यांचे विहीर व बोरवेलवर बसवलेले सोलर पॅनल फुटून नुकसान झाले आहे. या वादळी वाऱ्यामुळे पात्रुड येथील शेतकरी चंद्रकांत इंद्रजीत शिंदे यांचे शेत गट क्रमांक ३६७ आहे त्यांनी शेतात बसवलेल्या सौर पॅनल वादळी वाऱ्याने फुटल्याने ते हतबल झाले आहेत. तसेच पात्रुड येथील रोहिणी अशोक शिंदे गट क्रमांक ३४६ मध्ये त्यांची शेतजमीन असून त्यांच्या देखील सौर पॅनल नुकसान झाले आहे. आधीच शेतकरी कर्जबाजारी असताना शेतकऱ्यावर निसर्ग कोपल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे.



आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असताना व सरकार कर्जमाफीचे पोकळ आश्वासने व घोषणाबाजी करत असल्याने शेतकरी पूर्णतः हतबदल झालेला आहे. असे असताना काल झालेल्या निसर्गाच्या प्रकोपामुळे शेतकरी व आसमानी संकट कोसळलेले आहे तरी शासनाने व सोलर सौर ऊर्जा कंपनीने तात्काळ पंचनामे करू शेतकऱ्यास ताबडतोब नुकसान भरपाई द्यावी. असे समस्त शेतकरी बांधवातून बोलली जात आहे.

# दोनशे साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे अठ्ठाविसशे कोटी रुपये थकवले

## मदत नको, फौजदारी गुन्हा दाखल करा:ॲड. अजित देशमुख

बीड :प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा ऊस त्याच्या शेतातून नेल्यानंतर चौदा दिवसात उसाचे संपूर्ण बिल देण्याची तरतूद शुगर केन कंट्रोल ॲक्ट १९६६ मध्ये आहे. मात्र राज्यातील २०९ कारखान्यांनी २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये गाळप केलेल्या उसाचे २८००कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले नसल्याची गंभीर बाब जनआंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी समोर आणली आहे.

याबाबत माहिती देताना ॲड. देशमुख यांनी म्हटले की, राज्यात सन २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये २०९ कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप केले. या २०९ कारखान्यांची दैनंदिन गाळप क्षमता नऊ लाख सत्तर हजार आठशे बारा मेट्रिक टन एवढी आहे. तर या हंगामामध्ये या कारखान्यांनी एकूण दहा लाख बत्तीस हजार सातशे दहा मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे.

शासनाने गाळप हंगाम सुरू होत असताना कारखान्यांना गाळप परवाना देत असताना त्यात एफ. आर. पी. ची रक्कम मुदतीत दिली जाईल याची हमी घेतलेली असते. त्याचप्रमाणे कायद्यातील तरतूद देखील याप्रमाणेच आहे. मात्र कारखाने बंद झाल्यानंतर काही महिने लोटले तरी शेतकऱ्यांचे २८०० कोटी रुपये अजूनही दिलेले नाहीत. याबाबत देशमुख यांनी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर ही गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे आता याबाबत देशमुख यांनी राज्यातील एफ.आर.पी. मुदतीत न देणाऱ्या साखर कारखान्यांच्या संचालकांवर गुन्हे दाखल करून विलंब कालावधीची रक्कम शेतकऱ्यांना पंधरा टक्के व्याज असलेल्या देण्याची मागणी केलेली आहे. यावर साखर आयुक्तालय काय निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांची लक्ष वेधले आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांमध्ये एकजूट नाही. शेतकरी आपल्या हक्का प्रति भांडत नाही. शेतकऱ्यांसाठी कडे आंदोलनासाठी वेळ नाही. या सर्व बाबी साखर सम्राट यांना माहित आहेत. म्हणून हे सर्व घडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जागे होऊन आपापल्या कारखानदारांना एकत्र येऊन जाब विचारावा, असे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

आता हे साखर कारखानदार केंद्र सरकारच्या सहकार विभागाकडे जाऊन या ही रक्कम देण्यासाठी पैसे मागत आहेत. ही बाब अत्यंत चुकीची असून सर्व राजकारणी एकसारखे असून शेतकऱ्यांना बुडवण्याचे काम सातत्याने होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने साखर कारखान्यांना मदत करू नये, असे निवेदन ॲड. अजित देशमुख यांनी केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांना पाठविले आहे. या कारखानदारांवर गुन्हे दाखल करून रक्कम व्याजासह द्यावी, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांना विधान परिषदेची उमेदवारी द्यावी : किरण रेडेकर,संजय बोत्रे



वडवणी प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विधान परिषद निवडणुकीची उमेदवारी ज्येष्ठ समाजसेवक व जनतेशी घट्ट नाळ असलेले डॉ.ओमप्रकाश शेटे यांना देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली असल्याची माहिती वडवणी तालुका देवदुत प्रतिष्ठान चे किरण रेडेकर, संजय बोत्रे यांनी दिली आहे.

डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले असून धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यात त्यांचा व्यापक जनसंपर्क आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकाऱ्यांशी तसेच सर्वसामान्य जनतेशी त्यांचे घनिष्ठ संबंध असल्यामुळे ते या मतदारसंघाचे प्रभावीपणे प्रतिनिधित्व करू शकतात. विकासाभिमुख दृष्टीकोन, संघटन कौशल्य आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची क्षमता लक्षात घेता भारतीय जनता पक्षाने डॉ. ओमप्रकाश शेटे यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी द्यावी. त्यांच्या उमेदवारीमुळे धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यांच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास किरण रेडेकर, संजय बोत्रे व देवदूत प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सदर मागणी ची प्रत मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठवण्यात आली असल्याची माहिती किरण रेडेकर, संजय बोत्रे , सागर मैत्री, गोरख बागडे व दिगंबर अलगट यांनी दिली आहे.

# शॉर्टसर्किटमुळे घराला आग; शेतकऱ्याचा २० क्विंटल कापूस जळून खाक; चिंचाळा येथील घटना

वडवणी :प्रतिनिधी

चिंचाळा येथे बुधवारी सकाळी दहा वाजता शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत यशवंत कुलकर्णी या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून सुमारे २० क्विंटल कापूस जळून खाक झाला. तसेच घरातील संसारोपयोगी साहित्यही आगीत भस्मसात झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतकऱ्याने आपल्या घरातील दोन खोल्यांमध्ये कापूस साठवून ठेवला होता. अचानक विद्युत शॉर्टसर्किट झाल्याने घराला आग लागली.

काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण करत एका खोलीतील संपूर्ण कापसाला वेढले. यात सुमारे २० क्विंटल कापूस पूर्णपणे जळून खाक झाला.

आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग



विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, दुसऱ्या खोलीतील कापूस ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी तत्परता दाखवत बाहेर काढला. त्यामुळे दुसऱ्या खोलीतील कापूस वाचविण्यात यश आले.

या आगीत घरातील फर्निचर, कपडे, धान्य तसेच इतर संसारोपयोगी साहित्याचेही मोठे नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे शेतकरी कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले असून प्रशासनाने पंचनामा करून तातडीने मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# धारूर शहरातील प्रलंबित प्रश्नांवर विकास संघर्ष समिती आक्रमक

## पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक व सुरक्षेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले

धारूर : प्रतिनिधी

धारूर शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध मूलभूत समस्या व प्रलंबित मागण्या तात्काळ मार्गी लावाव्यात, या मागणीसाठी किल्ले धारूर विकास संघर्ष समितीच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. शहराच्या विकासासह नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक गंभीर प्रश्नांकडे या निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात कायमस्वरूपी विद्युत रोषणाई व संरक्षक कठडे उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याने विशेषतः शिनगारे गल्ली, मोठा चौक व इतर भागांत कमी दाबाने आणि अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत असून तसेच शहरामध्ये पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी पाणीपुरवठ्याचे नियोजनबद्ध वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणीही करण्यात आली. तसेच शहरातील खराब रस्ते, खड्डे आणि वाहतुकीच्या वाढत्या समस्येकडे लक्ष वेधत मुख्य रस्त्यांवर गतिरोधक बसविणे, महत्त्वाच्या चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आणि धोकादायक ठिकाणी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी समितीने केली आहे. विशेषतः शहरातील बसस्थानक परिसरातील रस्त्यांची दुरवस्था नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय शहरातील पथदिवे रात्रीच्या वेळी नियमित सुरू ठेवावेत, वाहतुकीस अडथळा ठरणारे वीज खांब व डीपी हलवावेत, तसेच पावसाळ्यापूर्वी धोकादायक व जीर्ण इमारतींचे सर्वेक्षण करून आवश्यक कारवाई करावी,नगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांचा तातडीने लिलाव करावा, शहरातील मोकाट कुत्रे व इतर जनावरांच्या बंदोबस्तासाठी उपाययोजना कराव्यात, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून शहर हरित करावी, शहरात नालेसफाई, धूरफवारणी व स्वच्छता मोहिम राबवावी व नागरिकांसाठी उद्याने, क्रीडांगणे व वॉकिंग ट्रॅक विकसित करून शहरातील सुविधा वाढविण्याची मागणीही विकास संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी संदीप शिनगारे, अशोक शिनगारे ,युवराज फुन्ने, पवन धोत्रे सह नागरिक उपस्थित होते.

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतमजूर गंभीर जखमी

धारूर : प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी (बोडखा) परिसरात रानडुकरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी सायंकाळच्या सुमारास शेतमजूर भागवत आबुज यांच्यावर रानडुकराने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्वराती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भागवत आबुज हे शेळ्या चारण्यासाठी कासारी शिवारातील पाझर तलावाजवळ गेले होते. यावेळी झुडपातून अचानक बाहेर आलेल्या रानडुकराने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे त्यांना स्वतःचा बचाव करण्यास वेळ मिळाला नाही. रानडुकराच्या धडकेत त्यांच्या कमरेला व पायाला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी अवस्थेतील आबुज यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.





# वडवणी येथे जनगणना २०२७ घर यादी कामकाजाची पाहणी

वडवणी:प्रतिनिधी

जनगणना २०२७ च्या प्रथम टप्प्यातील घर यादी कामकाजाचा आढावा घेण्यासाठी दि. २७ मे २०२६ रोजी नगरपंचायत वडवणी येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट झाली. यावेळी श्री. सूर्यवंशी, जिल्हा जनगणना अधिकारी, श्री. अनुज गोठी, जनगणना राज्य समन्वयक तसेच श्री. आशिष शिंदे, जनगणना जिल्हा समन्वयक यांनी नगरपंचायत वडवणी कार्यक्षेत्रातील विविध प्रगणक गटांना भेट देऊन घर यादी () कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर दौऱ्यामध्ये घर यादी कामकाजाची प्रगती, माहिती



संकलनाची अचूकता, नकाशे व अभिलेखांची पूर्तता तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित प्रगणक व पर्यवेक्षकांची उपस्थिती सुनिश्चित करून आवश्यक अभिलेखे, नकाशे, साहित्य, प्रपत्रे व इतर कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान श्री. पी. एन. निगळ, चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपंचायत वडवणी, श्रीमती एम. एच. करंडे, अतिरिक्त चार्ज अधिकारी, श्री. एस. डी. कुरकुटे, जनगणना लिपीक, श्री. यू. शेळके, तांत्रिक सहाय्यक तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, प्रगणक व पर्यवेक्षक उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नगरपंचायत वडवणी अंतर्गत सुरू असलेल्या जनगणना कामकाजाचे कौतुक करत संबंधित प्रगणक व पर्यवेक्षक यांनी उत्कृष्ट प्रकारे कार्य केल्याचे नमूद केले. तसेच पुढील घर यादी () कामकाज अधिक सुरळीत, प्रभावी व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

**टी. सी. हरवला आहे**

संतोष प्रल्हादराव डावकर या नावाचा इ. १० वी. पासचा मुळ टी.सी. वडवणी ते बीड बस प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

मो. नं. ९८९०७ ३०७९५

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

अर्जदाराचे नाव श्री. संदीपान बळीराम खोते

विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव श्री. गणेश अच्युतराव खोते

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ५२९ प्लॉट क्र. १९ मिळकत क्र. २९०२ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार :- पूर्वपश्चिम ०६ मीटर दक्षिणोत्तर ०९ मीटर एकूण क्षेत्रफळ ५४ चौ.मी.

पूर्व - प्लॉट क्र. २०, पश्चिम - प्लॉट क्र. १८, दक्षिण - ०६ मीटर रस्ता, उत्तर - गट क्र. ५२९ चा भाग

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. २७/०५/२०२६

अर्जदाराचे नाव श्रीमती. शेवंताबाई परमेश्वर शिंदे

विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव श्री. रामभु उत्तमराव मुंडे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४०३ मिळकत क्र. २६२० वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार :- पूर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकूण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी.

पूर्व - गुरुप्रसाद यांचा प्लॉट, पश्चिम - रस्ता, दक्षिण - रामेश्वर अंकुश मुंडे, उत्तर - ओतारी यांचे घर

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. २७/०५/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. अशोक खंडेराव कुलकर्णी

विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव श्री. रामराव सुदामराव घोरड

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४४६ प्लॉट क्र. ५२ मिळकत क्र. २२२१ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार :- पूर्वपश्चिम १३.७९ मी. दक्षिणोत्तर १४.५० मीटर एकूण क्षेत्रफळ ११८.७९ चौ.मी.

पूर्व - ०६ मीटर रस्ता, पश्चिम - प्लॉट क्र. ६३, दक्षिण - प्लॉट क्र. ५१, उत्तर - ०९ मीटर रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. २७/०५/२०२६

अर्जदाराचे नाव श्री. रामभाऊ अच्युत जाधव

विक्री किंवा नावे करून देणाऱ्याचे नाव श्री. अच्युत गोवु जाधव

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ४०७ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार :- पूर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर १२.५० फुट एकूण क्षेत्रफळ ३४.८५ चौ.मी.

पूर्व - रस्ता, पश्चिम - अनिल घुले, दक्षिण - सुनील घुले, उत्तर - एकनाथ सुखाराम पवार

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
शुक्रवार, दि.२९ मे २०२६ । पान ४

## नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी पाहणी केली

वडवणी :आ. प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून वडवणी शहरातील रस्त्यांच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध झाला आहे. त्या निधीतून शहरातील विविध विकासकामे वेगाने सुरू असून नागरिकांना उत्तम, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी नगराध्यक्ष शेषेराव जगताप सातत्याने प्रयत्नशील आहेत.शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या रस्त्याच्या सुरू असलेल्या कामाची नगराध्यक्ष जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला..वडवणी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रकाश सोळंके व जयसिं सोळंके यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवास असाच सुरू राहणार असल्याचे मत नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी व्यक्त केले.





## सरपंच ॲड.मयुर आंधळे म्हणजे करेक्ट नियोजन,परफेक्ट कार्यक्रम

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात रुई पिंपळा प्रथम

वडवणी :प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६ अंतर्गत वडवणी तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये मौजे रुई (पिंपळा) ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावत शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या १५ लाख रुपयांच्या विशेष बक्षिसावर आपले नाव कोरले आहे. या यशामुळे गावाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सरपंच ॲड.मयुर आंधळे यांनी केलेले करेक्ट नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रमाचे हे यश म्हणावे लागेल. या यशामुळे सर्व स्तरातून रुई ग्रामपंचायतीचे कौतुक होत आहे.

वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यात वसलेले रुई (पिंपळा) हे पुनर्वसित गाव म्हणून ओळखले जाते. गावच्या विकासाची धुरा युवा व उच्चशिक्षित सरपंच ॲड. मयूर आंधळे यांनी गेल्या काही वर्षांपासून सांभाळली असून त्यांच्या नेतृत्वाखाली गावात विविध विकासकामांना गती मिळाली आहे. शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून गावातील मूलभूत सुविधांसह अनेक विकासात्मक कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या

दोन ते तीन वर्षांत ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या विकासकामांची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या उच्चस्तरीय समितीने नुकतीच गावाला भेट दिली होती. समितीने गावातील विकासकामे, स्वच्छता, सुविधा आणि ग्रामविकासातील

बदल यांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या पाहणीनंतर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानात रुई (पिंपळा) ग्रामपंचायतीला तालुक्यात प्रथम क्रमांक जाहीर करण्यात आला. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल ग्रामपंचायतीला शासनाकडून १५ लाख रुपयांचे विशेष बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. तसेच रुई (पिंपळा) गावाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी

आणि विविध स्तरातील पदाधिकाऱ्यांनी सरपंच ॲड. मयूर आंधळे यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी सरपंच आंधळे यांनी ग्रामस्थ, ग्रामविकास विभाग, जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासनाचे आभार मानले.

## त्या...आरोपींना तात्काळ अटक करा : विष्णू मुजमुले

वडवणी:प्रतिनिधी

दलित समाजातील उमेश दळवी या व्यक्तीला बांधून मारहाण करून निघ्रपणे खून करण्यात आला आहे. यातील जे आरोपी आहेत त्यांना तात्काळ अटक करून त्यांना कठोर शासन करावे. तसेच हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा. अशी मागणी मानवी हक्क अभियानाचे बीड जिल्हा अध्यक्ष विष्णू मुजमुले यांनी केली आहे त्यांनी या प्रकरणाचे निवेदन जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना दिले आहे.

मानवी हक्क अभियान यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि.२४/०५/२०२६ रविवार रोजी काही मनोवादी जातीवादी यांनी मजुर दलित उमेश दळवी या व्यक्तीचा बांधुन मारहाण करुन त्याचा खुन करण्यात आला. याची एफ. आय. आर देखील दाखल झाली आहे. भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ११५(१), ३५१ (२), ३५२, ३ (१) (आर), ३(१) (ड), या कलाम अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. अश्या आरोपीला मोकाट सोडणे म्हणजे आजुन दुसऱ्यावर सुध्दा त्या पध्दतीचा गुन्हा करून शकतात. त्यामुळे सर्व आरोपीला तात्काळ अटक करावे. त्यांच्यावर महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाईझर्ड क्राईम ॲक्ट (मोक्का) नुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व फास्ट ट्रक्ट कोर्टामध्ये चालवुन त्या आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अन्यथा मानवी हक्क अभियान या संघटनेच्या माध्यमातुन महाराष्ट्र भर आंदोलन करण्यात येईल.

याची दखल मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी घ्यावी अन्यथा मानवी हक्क अभियान रस्त्यावर उतरून आंदोलन करेल व पिडीत कुटूंबाला आर्थीक मदत म्हणुन २५ लक्ष रुपये देण्यात यावे. पिडीत कुटूंबातील एक सदस्य शासकीय नौकरीला घेण्यात यावे. पिडीत कुटूंबातील कर्ता पुरुष गेल्यामुळे त्याचे घर उघडयावर पडले आहे व त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या निवेदनावर मानवी हक्क अभियानाचे बीड जिल्हा अध्यक्ष विष्णू मुजमुले, तालुकाध्यक्ष धोंडीबा हातागळे, ज्येष्ठ नेते ॲड. बळीराम नाडे, ज्येष्ठ महिला नेत्या अलका ताकतोडे यांच्यासह आदी जणाच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणकडून कर्तृत्ववान व्यक्तीमत्वांचा गौरव : डॉ.अशोक ढवण

### कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण


वडवणी:प्रतिनिधी

दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व विद्यार्थीप्रिय प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणा निमित्त स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे वितरण बुधवार, दिनांक २७ मे रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे करण्यात आले. या निमित्ताने मान्यवरांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा आणि पूर्वसंध्येला खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता.

बुधवार, दिनांक २७ मे रोजी सकाळी वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून नियोजित कार्यक्रमास सुरूवात झाली. या मेळाव्याचे उद्घाटक व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.अशोक ढवण (माजी कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) हे होते. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.उदय खोडके , डॉ.अशोक थोरात (संचालक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई.), राहुल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, बीड.), डॉ.अनिलकुमार भिकाणे (माजी विस्तार संचालक, महाराष्ट्र राज्य पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ.), ज्येष्ठ पत्रकार अरूण समुद्रे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी मान्यवरांनी दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन केले. त्यानंतर स्मृती प्रतिष्ठाणकडून मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक करताना बाळासाहेब सुर्यवंशी यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा विस्तृत आढावा घेतला. दिवंगत सासरे, सहयोगी अधिष्ठाता व विद्यार्थीप्रिय प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलू, स्वभाव वैशिष्ट्ये उपस्थितांसमोर ठेवली. समाजाचे आपण काही देणे लागतो. या भावनेतून हा कार्यक्रम घेण्यामागे तरूण पिढीला दिशा व प्रेरणा मिळावी हा विधायक हेतू आहे. हा उपक्रम मागील ११ वर्षांपासून आयोजित करीत आहोत असे सुर्यवंशी (लातूर) यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी डॉ.उदय खोडके यांनी ठोंबरे परिवार कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करते. हा उपक्रम प्रबोधनपर आहे. कै.डॉ. बालासाहेब ठोंबरे सर हे समाजस्नेही व्यक्तीमत्व होते. त्यांनी समाज, विद्यार्थी व शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य केले. उंदरी गाव आदर्श व्यक्तींची खाण आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. आई ही संस्काराची शाळा व कष्टाचे विद्यापीठ असते असे प्रतिपादन डॉ.खोडके यांनी केले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उद्घाटक माजी कुलगुरू डॉ.अशोक ढवण यांनी सांगितले की, ठोंबरे परिवाराशी आमचा जुना स्नेहबंध आहे. आई - वडिलांची सेवा करणारे, बंधू प्रेमाचा संस्कार रूजविणारे, सेवाभाव जोपासणारे, माणुसकी जीवंत ठेवणाऱ्या. एकत्र कुटुंब पद्धतीचा आदर्श टिकवून ठेवणाऱ्या, सेंद्रिय शेतीतील कार्य व प्रयोगशील शेतकरी बांधवांना प्रेरणा व बळ देणारे, पत्रकारिता, संगीत,

शिक्षण, समाजसेवा, आरोग्य, कृषी, साहित्य, सहकार, विधी, प्रशासन, उद्योग, व्यवसाय तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक बांधिलकी जोपासून विविध क्षेत्रात निस्वार्थपणे व समर्पित भावनेतून कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तिमत्वांचा ठोंबरे कुटुंबिय दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करते हे अभिनंदनीय कार्य आहे. हे प्रतिष्ठान चांगले उपक्रम राबवून कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे यांचे समर्पित कार्य व संस्काररूपी विचार पुढे नेत आहे. हा पुरस्कार सोहळा महाराष्ट्रात बीड जिल्ह्याचा नांवलौकिक वाढविणारा आहे असे गौरवोद्गार डॉ.ढवण यांनी काढले. यावेळी संचालक डॉ.अशोक थोरात, जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे, डॉ.अनिलकुमार भिकाणे यांनीही समायोचित मार्गदर्शन केले. तर युवा नेते रणजित आडसकर यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले. ज्येष्ठ पत्रकार अरूण समुद्रे, सामाजिक कार्यकर्त्या संगीता झरे, उद्योजक डॉ.छगन राठोड, डॉ.बालासाहेब सोनवणे या पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी तसेच पुरस्कार प्राप्त मान्यवर श्रीमती लक्ष्मीबाई प्रभाकर कराड यांच्या वतीने त्यांचे सुपुत्र तथा न्यायाधीश अच्युत प्रभाकरराव कराड (अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी तथा दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड.) यांनी अतिशय समर्पक व नेमक्या शब्दांत सत्काराला उत्तर दिले. सुरूवातीला ६ मान्यवरांना कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कार तर अन्य २ जणांना अनुक्रमे स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील व स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते वाहनाची पूजा



वडवणी :प्रतिनिधी

इस्लामपूरचे लोकप्रिय आमदार तथा माजी मंत्री जयंतराव पाटील यांच्या शुभहस्ते दि. २५/०५/२०२६ मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता मुंबई येथे श्रीराम मुंडे यांच्या नवीन महिंद्रा स्कॉर्पिओ टॉप मॉडेल गाडीची विधिवत पूजा करण्यात आली. गाडीला झेंडूच्या फुलांचे हार, पानांचे तोरण बांधून सजवण्यात आले होते. जयंतरावजी पाटील साहेब यांनी नारळ फोडून

व कुंकवाचे स्वस्तिक काढून गाडीची पूजा केली. यावेळी गाडी मालक श्रीराम मुंडे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी माजी मंत्री जयंतराव पाटील यांचे आशीर्वाद घेतले.यावेळी नगरसेवक विजय नहार, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष इम्रान शेख, उद्योजक सर्जेराव तंटे व सर्व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पूजा झाल्यानंतर पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. या परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, कार्यकर्त्यांची प्रगती हेच माझे समाधान आहे. नवीन गाडी सुख-समृद्धी घेऊन येवो आणि अपघातां पासून रक्षण होवो, अशा शुभेच्छा देत. वाहतुकीचे नियम पाळून सुरक्षित प्रवास करा. असा सल्ला सुद्धा पाटील यांनी दिला.

भगवानबाबा सेवाभावी संस्था संचलित,

स्वामी विवेकानंद प्राथ. माध्यम व उच्च माध्यमिक विद्यालय व

**बन्सीधरराव मुंडे इंग्लिश स्कूल,**

वडवणी ता. वडवणी जि. बीड

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त स्वयंअर्थ साहाय्यत शाळेत पुढील पदे भरावयाची आहेत तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. 31/05/2026 वार रविवार रोजी मूळ कागद पत्रासह स्वखर्चाने खालील पत्यावर ठिक 10:00 ते 03:00 वाजता पर्यत उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पद | विषय | पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | मुख्याध्यापक / प्राचार्य | | M.A. B.Ed/ M.Ed | 01 |
| 2 | सहशिक्षक (प्राथ) | | HSC. D.Ed / B.A. D.Ed | 10 |
| 3 | सहशिक्षक (माध्य) | भाषा,गणित, विज्ञान | B.A./ B.sc/ B.Com B.Ed /M.Ed | 05 |
| 4 | कनिष्ठ प्राध्यापक | इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, भूगोल शिक्षणशास्त्र, ग्रंथालय व माहिती शा. | M.A. B.Ed / M.Ed | 04 |
| 5 | कनिष्ठ प्राध्यापक | Phy,Chem,Bio , Math | M.sc. B.Ed./ M.Ed | 04 |
| 6 | कनिष्ठ लिपिक | | B.A.B.Com | 02 |
| 7 | शिपाई | | SSC/HSC | 01 |

स्थळ : बन्सीधरराव मुंडे इंग्लिश स्कूल, वडवणी ता. वडवणी जि. बीड.

अधिक माहितीसाठी संपर्क 9405465555, 9881047708, 8999960333, 9665676930

★ गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच आमचा ध्यास ★

अध्यक्ष / सचिव







This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Waghmare Anil Shriram at Pragati Offset , Panchshilnagar, Wadvani, Tq. Wadvani, District. Beed, Maharashtra-431144 and published at the office of Weekly Dongarcha raja, Main Road, Wadvani, Tq. Wadvani, District Beed, Maharashtra- 431144, email:dongarcharaja@gmail.com, Mo.9422591805 (Not every news and artical in this issue has to be agreed upon by the editor, under the Wadvani court of appeals)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)